जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAY 2023

# निसर्गाने आखून दिलेली रूपरेषा ओलांडल्यास जीवन धोक्यात

## डॉ. जय सामंत; शिवाजी विद्यापीठात 'पर्यावरण संवाद'वर कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'पर्यावरण संवाद' या विषयावरील कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी डावीकडून डॉ. सुमेधा साळुंखे, शिवाजी जाधव, जय सामंत, व्ही. एन. शिंदे, निशा पवार, परशराम पवार उपस्थित होते.

कोल्हापूर,ता. १५ : 'पर्यावरणाच्या साखळीत माणूस हा शेवटचा घटक असूनही आपण निसर्गाच्या विरोधात जाऊन निसगनि आखून दिलेली रूपरेषा ओलांडत आहोत. त्यामुळे येणाऱ्या काळात मानवाचे भवितव्य धोक्यात आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरणाच्या जागतिक परिषदांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे, मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन प्रत्येक राष्ट्राने पर्यावरणविषयक जबाबदाऱ्यांबाबतही एकनिष्ठ राहिले पाहिजे', असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित 'पर्यावरण संवाद' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. 'शास्त्रज्ञांनी नवनवीन शोध लावले. त्यामुळे मानवी जीवन सुलभ झाले असले, तरी भौतिक सुखाच्या हव्यासापोटी साधने हळूहळू संपत चालली आहेत. त्यामुळे प्राथमिक गरजांचे संवर्धन करणे म्हणजे पर्यावरणाचे संवर्धन करणे असल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी 'पर्यावरण आणि माध्यमे' याविषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी पर्यावरणविषयक भारतातील चळवळींबाबत मार्गदर्शन केले. पर्यावरण संवर्धन ही सर्वांची जबाबदारी असून याबाबत समाजात जागृती करणे गरजेचे असते. यासाठी पर्यावरण चळवळी महत्वाच्या ठरतात, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी एसयुके रिसर्च व डेव्हलपमेंट फौंडेशनचे सीइओ डॉ. पी. डी. राऊत यांनी माध्यमातील पर्यावरण विषयक आशय आणि समस्या यावर मार्गदर्शन केले.

जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. परशराम पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : युवा सेनेच्या वतीने न्यू कॉलेजमध्ये आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी बोलताना डॉ. आलोक जत्राटकर. सोबत संजय पवार, विजय देवणे, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, मंजित माने आदी.

# सोशल मीडियामुळे कुटुंबात संवादाचा अभाव, परस्पराबद्दल अविश्वास

## डॉ. जत्राटकर : न्यू कॉलेजमध्ये 'सिया' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाज माध्यमांनी मानवाचे आयुष्य व्यापले आहे. सोशल माध्यमांचा कुटुंब व्यवस्थेवर दुष्परिणाम झाला असून संवादाचा अभाव व परस्पराबद्दल अविश्वास निर्माण होत आहे. तथापि, आज आपण सोशल मीडिया वापरतो की सोशल मीडिया आपल्याला वापरत हे तरुणाईने समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रतिपादन केले.

युवासेनच्या वतीने न्यू कॉलेजमध्ये आयोजित सोशल मीडियावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते म्हणाले, सोशल माध्यमांचा कुटुंब व्यवस्थेवर दुष्परिणाम झाला असून संवादाचा अभाव व परस्पराबद्दल अविश्वास निर्माण होत आहे. बालकांची कल्पना व स्मरणशक्तीवर परिणाम होत आहे. तरुणांमध्ये सृजनशीलतेऐवजी निष्क्रियता वाढत आहे.

शिवसेना जिल्हा प्रमुख संजय पवार, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, युवासेना जिल्हा प्रमुख मंजित माने, शिवसेना शहर प्रमुख रविकिरण इंगवले यांची मनोगते झाली. सूत्रसंचालन चैतन्य देशपांडे यांनी केले. रघू भावे यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा प्रमुख विजय देवणे, उपजिल्हा प्रमुख अवधूत साळोखे, अमित बाबर, युवराज मोरे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# युवासेनेतर्फे डॉ. जत्राटकर यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

युवासेना शहर-जिल्हा (उद्धव ठाकरे गट) यांच्या वतीने न्यू कॉलेज येथे 'सोशल मीडिया व ऑनलाईनच्या जमान्यात हरवत चाललेले नातेसंबंध' या विषयावरील व्याख्यान झाले. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर हे होते.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार, प्राचार्य वसंत पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख मंजित माने, शिवसेना शहरप्रमुख रविकिरण इंगवले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन चैतन्य देशपांडे यांनी केले. आभार रघू भावे यांनी मानले. जिल्हाप्रमुख विजय देवणे, उपजिल्हाप्रमुख अवधूत साळोखे, युवासेना जिल्हा चिटणीस अमित बाबर, युवराज मोरे, योगेंद्र माने, वैभव जाधव, सुनील चौगुले, पवन तोरस्कर, प्रदीप हांडे, प्रथमेश देशिंगे, सानिका दामुगडे, माधुरी जाधव, रोहित वेढे, अभी दाबडे, कीर्ती जाधव, अक्षय घाटगे, राजर्षी मिणचेकर, सुनील कानूरकर आदी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष

16 MAY 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाट्य कलाकाराने आपला मूळ आवाज ओळखावा

## प्रा. उमेश घळसासी; विद्यापीठात कार्यशाळा





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'शब्द आणि अभिनय' या विषयावरील कार्यशाळेत नाट्य व चित्रपट प्रशिक्षक प्रा. उमेश घळसासी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

▸ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : नाट्य कलाकाराने आपला मूळ आवाज ओळखला पाहिजे. सातत्याने आवाजाचा रियाज करायला हवा, असे नाट्य व चित्रपट प्रशिक्षक प्रा. उमेश घळसासी यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'शब्द आणि अभिनय' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेचा प्रारंभ सरस्वती पूजनाने झाली. अभिनय प्रकार, व्हाईस कल्चर, भूमिका अभ्यास तसेच एकाग्रता, आवाजासाठी वापरली जाणारी सप्तके आदी नाट्य कलेसाठी आवश्यक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. घळसासी यांनी विद्यार्थ्यांकडून विविध संस्कृत श्लोक, खेळ, आवाजासंदर्भातील व्यायाम करून घेतले. प्रा. डॉ. निखिल भगत यांनी स्वागत केले. डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. संजय तोडकर यांनी आभार मानले. ध्वनी आणि रंगमंच व्यवस्था मल्हार जोशी यांनी केली.

तरूण भारत

# माणसांवर सोशल मीडियाचा विपरीत परिणाम



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये युवा सेना (ठाकरे गट)च्या वतीने आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. अलोक जत्राटकर. सोबत शहरप्रमुख रविकिरण इंगवले, जिल्हाप्रमुख विजय देवणे, संजय पवार, मनजित माने आदी.

■ शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

स्मार्ट फोनचा गरजेनुसार वापर केला तर फायद्याचे आहे. परंतू सोशल मीडियामुळे परंपरा, नाती हरवत चालली आहेत. ऐवढेच नव्हे तर मानवी जीवनावर विपरीत परिणाम केला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांनी केले.

युवा सेनेच्या (ठाकरे गट) वतीने आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. न्यू कॉलेजमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'सोशल मीडिया व ऑनलाईनच्या जमान्यात हरवत चाललेले नाते संबंध' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

डॉ. जत्राटकर म्हणाले, सोशल मीडियामुळे वाचनावर परिणाम होत आहे. गरजेपेक्षा जास्त वेळ तरुण मोबाईलवर घालवत असल्याने एकूणच जीवनावर परिणाम होत चालला आहे. परंतू काही तरुणांनी याच सोशल मीडियाला उदरनिर्वाहाचे साधनही बनवले आहे. त्यामुळे तरुणांनी शिक्षण आणि रोजगार याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

शिवसेना जिल्हा प्रमुख संजय पवार, प्राचार्य वसंत पाटील, युवासेना जिल्हा प्रमुख मंजित माने, शिवसेना शहर प्रमुख रविकिरण इंगवले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन चैतन्य देशपांडे यांनी केले. आभार रघु भावे यांनी मानले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख विजय देवणे, उपजिल्हा प्रमुख अवधूत साळोखे, युवासेना जिल्हा चिटणीस अमित बाबर, युवराज मोरे, शहर युवाअधिकारी योगेंद्र माने, शहर समन्व्यक वैभव जाधव, उपजिल्हा युवाअधिकारी सुनील चौगुले, पवन तोरस्कर आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात आज बोन्साय कलेची प्रात्यक्षिके

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग व बोन्साय क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (दि. १६) रोजी वि. स. खांडेकर सभागृह, भाषा भवन येथे दुपारी चार वाजता 'बोन्साय - एक जपानी कला' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याप्रसंगी जपानमधील प्रसिद्ध कलेची माहिती, सादरीकरण व बोन्साय कला वापरून झाडे वाढवण्याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके कार्यक्रमात दाखविली जाणार आहेत. कलेविषयी समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन विदेशी भाषा विभागाने केले आहे.